# विवेक वर्धिनी विद्यालयात सायबर सुरक्षा उपक्रम

। पंढरपूर, प्रतिनिधी

विवेक वर्धिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुल, क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये संगणक शास्त्र संकुलन संकुलातील स्वप्नाली जाधव, वैष्णवी पाटील यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा विषयावर सेमिनार दिले. आजच्या ऑनलाईन युगात। विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल माहिती दिली. ओटीपी सांगू नये, अनोळखी नंबरील फोन पडताळणी करून घ्यावेत, व्हाट्सअप व इतर सोशल मीडिया मेसेजवर लिंकची शहानिशा करावी, पासवर्ड स्ट्रॉंग वापरून माहिती सुरक्षित करावी. मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉपवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा असे सांगितले. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. यु. आर. मुंढे, जेष्ठ शिक्षक ए.एप. पवार, क्रीडाशिक्षक एम.बी. रणदिवे, बी.एल. सिरसट, आर.एन. मुलाणी तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.